ePaper
|| वर्ष - 7 | अंक - 312 || UDYAM-MH-26-0158827 ||
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 1 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# सातारची जागा राखण्यासाठी पृथ्वीराज चव्हाण यांना गळ!



## आतील पानांत


- लखनऊने मिळवला पहिला विजय!
- सैफची लेक भडकली
- इंडिया आघाडीची दिल्लीत महारॅली!
- भाजपाने आमच्यासमोर बंडखोर उभे केले!


## सुप्रिया सुळे यांचा माण- ताथवडेत दौरा

# शरद पवारांना संपवण्याचे षडयंत्र!

## » लोकसभा रणसंग्राम : सुनेत्रा वहिनी माझ्यासाठी आईस्थानी!

। पिंपरी ।महाईन्यूज

**भाजपाला विकासाचे किंवा जनतेच्या हिताचं काही देण घेणं नाही. भाजपाचे नेते गेल्या काही वर्षांपासून बारामतीत बैठका घेत आहेत. त्यांना केवळ शरद पवार यांना संपवायचे आहे. याबाबत त्यांचे नेते बारामतीत पत्रकार परिषदेत चॅनलला मुलाखत देताना बोलले आहेत, असा घणाघाती आरोप सुप्रिया सुळे यांनी ताथवडेत केला.**



जशी मी पवारांची लेक तशा सुनेत्रा वहिनीही

सुळे यांनी रविवारी (ता. ३१) आयटी नगरी माण येथील मेगा पोलीस व ताथवडेतील पॅलेडिओ सोसायटीला भेट देऊन रहिवाशांशी संवाद साधला. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सविता दगडे, पुणे जिल्हा कार्याध्यक्ष महादेव कोंढरे, गंगाराम मातेरे, शिवाजी बुचडे, दीपाली कोकरे, शिवाजी जांभुळकर, सविता गवारे, निकिता रानवडे, स्वाती ढमाले, दगडू करंजावने, संदीप साठे, सुप्रिया पवार, विजय पवार, रुपाली ढोकळे, चेअरमन चेतन पगारे, गुंजन शहा यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे व महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

सुळे पुढे म्हणाल्या, शरद पवारांच्या रूपाने दिल्लीत असलेला महाराष्ट्राचा बुलंद आवाज संपविण्याची भाषा भाजप करत आहे. उमेदवारी देखील माझ्या मोठ्या वहिनीला दिली. मी ज्या संस्कृतीत वाढले त्या संस्कृतीत मोठ्या भावाची बायको आईच्या जागी आहे. त्यामुळे आईच्या जागेवर मला वहिनी आहेत माझ्या मोठ्या भावाच्या पत्नी आहेत. त्यातच भाजपकडे कुठलाही उमेदवार नाही तो पण कशासाठी तर पवार साहेबांना संपवण्यासाठी. हेच गलिच्छ राजकारण भाजप करतय आहे.

**»अतिशय सुसंस्कृत अशा आमच्या सुनेत्रा वहिनी आहेत. त्या गेल्या अनेक वर्षे आमच्या घरात नांदल्या आहेत जशी मी पवाराची लेक ताशा त्याही पावरांची लेक आहेत त्यामुळे अर्थातच त्यांचा मान सन्मान मी करते. मी इंडिया आघाडीचे आभार मानते की, त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला मतदारांच्या आशिर्वादाने मी या देशाची निष्ठेने सेवा करेन. ही कौटुंबिक लढाई नसून माझ्यासाठी वैचारिक लढाई आहे.तर माण मध्ये त्या म्हणाल्या, अदृश्य शक्ती कशाप्रकारे त्रास देत आहे ते सर्वांना माहितच आहे. याचे योग्य उत्तरही जनता येत्या निवडणूकीत देईल.**

# लाचप्रकरणी प्राध्यापिका एसीबीच्या जाळ्यात!

## » सांगवीतील प्रकार : 25 हजाराचा मोह पडला महागात

। पिंपरी ।महाईन्यूज ।

पीएचडी डीग्रीसाठी प्रबंध सादर करणे आणि त्याला अप्रुव्हल देण्यासाठी २० हजारांची लाच स्वीकारणाऱ्या प्राध्यापिकेला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याने एकच खळबळ उडाली आहे. सांगवी परिसरातील बा. रा. घोलप या महाविद्यालयात ही कारवाई करण्यात आली असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात



एक प्राध्यापक प्रबंध सादर करणार होते. लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधकच्या (एसीबी) पुणे विभागाने शनिवारी (३० मार्च) ही कारवाई केली आहे. डॉ. शकुंतला निवृत्ती माने (वय ५९), असे ताब्यात घेतलेल्या प्राध्यापिकेचे नाव आहे. डॉ. माने ही सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाची प्राध्यापक (वर्ग १) आहे. तसेच सावित्रीबाई फुले विद्यापीठाकडून मान्यताप्राप्त पीएचडी मार्गदर्शक आहे. याप्रकरणी ४० वर्षीय प्राध्यापकाने एसीबीकडे तक्रार केली. एसीबीचे सहायक पोलीस आयुक्त नितीन जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ४० वर्षीय व्यक्ती प्राध्यापक असून त्यांनी अर्थशास्त्र विषयामध्ये पीएचडी डीग्री प्राप्त करून घेण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे वीद्यापीठाकरीता ऑनलाइन प्रबंध तयार केलेला आहे. हा प्रबंध विद्यापीठाकडे सादर करण्यासाठी तक्रारदार प्राध्यापकांचे मार्गदर्शक (गाईड) म्हणून डॉ. शकुंतला माने यांची विद्यापीठाकडून नियुक्ती झालेली आहे. तक्रारदार प्राध्यापकाने सादर केलेला प्रबंध रिजेक्ट करण्यासाठी व सुधारणा करून पुन्हा सादर करणे व त्यावर अप्रुव्हल देणे यासाठी डॉ. शकुंतला माने हिने तक्रारदार प्राध्यापकाकडे २५ हजार रुपयांची लाच मागितली.

### सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल...

»तक्रारदार प्राध्यापकाने याबाबत एसीबीकडे तक्रार केली. त्यानुसार एसीबीने पडताळणी केली असता, डॉ. माने हिने लाच मागितल्याचे समोर आले. लाचेच्या २५ हजारांपैकी पहिला हप्ता म्हणून २० हजार रुपये लाच स्वीकारल्यावर डॉ. माने हिला ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. एसीबीचे पोलीस उपअधीक्षक सुदाम पाचोरकर तपास करीत आहेत.

## मतदार संघात कोल्हेंनी वेळच दिला नाही?

# मतदारांची नाराजी 'दादां'च्या पथ्यावर!

### लोकसभा रणसंग्राम : शिरुरमध्ये कोल्हे विरुद्ध आढळराव 'हाय प्रोफाईल' लढाई

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक हाय प्रोफाईल लढतीपैकी एक लढत हि शिरूर लोकसभा मतदार संघात होत आहे. यंदा देखील अभिनेते आणि विद्यमान खासदार अमोल कोल्हे (शरद पवार गट ) यांच्या समोर माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) यांचे आव्हान असणार आहे. प्रचाराची जोरदार सुरुवात दोन्ही बाजूंनी सुरु आहे मात्र मतदारसंघात न फिरकल्याचा अमोल कोल्हे यांना बसणार फटका बसणार असल्याची चर्चा सध्या नागरिक करत आहेत.**




शिरूर लोकसभा मतदारसंघात २०१९ ला डॉ. कोल्हे यांना त्यांनी केलेला मालिकांमधील ऐतिहासिक भूमिकेचा मोठा फायदा झाला होता, ते निवडून देखील आले मात्र त्यानंतर जनतेशी त्यांचा संपर्क म्हणावा तितका राहिला नाही. जनतेने देखील मोठ्या अपेक्षेने त्यांना भरभरून मतदान केले मात्र त्याबदल्यात त्या मायबाप जनतेला भरघोस आणि ठोस असे काहीही मिळाले नसल्याचे चित्र सध्या आहे. मागील वेळी अनुकूल असणारी परिस्थिती आता तशी राहिलेली नाही. मतदारसंघात ते फारसे न फिरल्यामुळे त्याचा फटका त्यांना या निवडणुकीमध्ये जास्त बसण्याची शक्यता आहे. सर्वसामान्य नागरिकांपासून त्यांचे पदाधिकारी आणि नेत्यांना देखील कोल्हे भेटत नसल्यामुळे त्यांच्यावर असलेली नाराजी आजही कायम आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फाटाफुटीनंतर प्रथम अमोल कोल्हे हे अजित पवार यांच्यासोबत गेले होते, त्यांना पाठिंबा देत मंत्रिमंडळाच्या शपथविधीलादेखील उपस्थित होते. नंतर त्यांनी 'यू' टर्न घेत संधी साधण्यासाठी शरद पवारांसोबत राहिले अशी देखील कुजबुज आहे.

#### आढळरावांचा मतदार संघात संपर्क...

निवडून दिल्यानंतर मतदारांना उपलब्ध न झालेले खासदार अगदी निवडणुकीच्या तोंडावर काही महिने मतदारसंघात येतात शेतकऱ्यांचे प्रश्न घेतात लोकसभेत भाषणबाजी करतात आणि मला शेतकऱ्यांची फार काळजी आहे असे भासवण्याचा प्रयत्न करतात, असा आक्षेप आढळराव पाटील समर्थकांमधून घेतला जात आहे. कोल्हे यांना संसदरत्न पुरस्कार मिळाला मात्र मतदारांना काय मिळाले असा देखील सवाल काहीजण करत आहेत. या उलट पराभवाने खचून न जाता शिवाजीराव आढळराव हे सातत्याने जनतेच्या संपर्कात राहिले भाषणबाजी न करता कार्यकर्ते आणि जनतेच्या सुख-दुखाच्या प्रसंगात उपलब्ध झाल्याने जनतेचा त्यांच्याशी असलेला संपर्क आबाधित राहीला. आता हाच मुद्दा आढळराव पाटील यांच्यासाठी फायद्याचा ठरणार का? हे निकालातून स्पष्ट होईल.

---

## मोहोळांना मिळणार देवधरांचीही साथ!

### लोकसभा निवडणूक : आजी-माजी पदाधिकाऱ्यांच्या भेटींचा धडाका

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचाराचा जोर हळूहळू वाढू लागला आहे. मोहोळ यांना विविध क्षेत्रातून आणि विविध समाजातून पाठिंबा मिळत आहे. दुसरीकडे लोकसभेसाठी इच्छुक असलेल्या भाजपच्या नेत्यांचाही मोहोळ यांना पाठिंबा मिळत असल्याने मोहोळांची ताकद दिवसेंदिवस वाढत आहे. भाजपकडून पुणे लोकसभा लढविण्यासाठी इच्छुक असलेले भाजपचे माजी राष्ट्रीय सचिव सुनील देवधर हेही आता सक्रिय झाले आहे. मोहोळ यांनी रविवारी देवधर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.**



यावेळी देवधर यांनी पुष्पगुच्छ देऊन आणि तोंड गोड करुन मोहोळ यांचा स्वागतपर सन्मान केला आणि विजयासाठी सदिच्छा दिल्या. पुणे लोकसभेसाठी भाजपकडून मुरलीधर मोहोळ, माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक, माजी खासदार संजय काकडे, भाजपचे माजी राष्ट्रीय सचिव सुनीलजी देवधर हे इच्छुक होते.

या सर्व इच्छुकांनी उमेदवारी जाहीर होण्याअगोदर इच्छुक असल्याची इच्छा व्यक्त करताना शेवटी पक्षाचा आदेश हा अंतिम असल्याचे म्हटले होते.

आत्ता स्पर्धेत असलो तरी आमच्यापैकी पक्ष ज्या कोणाला उमेदवारी देईल तेव्हा सर्व गोष्टी विसरून त्याच्या पाठीमागे उभे राहण्याचे भाजपची शिकवण असल्याचेही त्यांनी म्हटले होते. त्याची प्रचिती भाजपमध्ये येत आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीत आणि महत्वाचे म्हणजे ज्या पक्षाचा उमेदवार मोहोळ यांच्या विरोधात निवडणूक लढवत आहे. त्या काँग्रेस पक्षात अजूनही नेत्यांमध्ये समन्वय नसल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम दिसून येत आहे.

#### भाजपाचा विजयाचा निर्धार...

महायुतीचे उमेदवार मोहोळ यांनी प्रचाराबरोबरच त्यांच्याबरोबर लोकसभेसाठी इच्छुक असलेल्यांच्या भेटीचा सपाटा लावला आहे. त्यामुळे त्यांची ताकद दिवसेंदिवस वाढत आहे. पक्ष नेतृत्वाने नाराजी दूर केल्यानंतर इच्छुक राहिलेले नेते अंगझटकून कामाला लागले आहेत. मुरलीधर मोहोळ यांनी सुनील देवधर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यावेळी दोघांमध्येही लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध विषयांवर संवाद झाला...पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचं विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी आगामी लोकसभा निवडणुकीत पुणे लोकसभा मतदारसंघात मोठ्या विजयाचा निर्धारही केला.

---

## लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रेडीरेकनर दर 'जैसे थे'



।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

कोणत्याही जमिनीचे किंवा घरांचे व्यवहार करताना पाहिल्या जाणाऱ्या रेडीरेकनर (चालू बाजारमूल्य दर) यांच्यात कोणतीही वाढ न करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. गेल्या वर्षी देखील रेडीरेकनर दरात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नव्हती. यंदा लोकसभा आणि पाठोपाठ होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी राज्यातील स्थावर मालमत्तांचे रेडीरेकनर दर जैसे थे ठेवण्यात येतील, अशी माहिती राज्याचे माहिती नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक हिरालाल सोनवणे यांनी 'लोकसत्ता'शी यांनी दिली.

महाराष्ट्र सरकारच्या सूचनेनुसार २०२४-२५ च्या आर्थिक वर्षात २०२२-२३ मधील वार्षिक दर तक्ते, मूल्यांकन मार्गदर्शन सूचना आणि नवे बांधकाम दर संपूर्ण राज्यासाठी कायम ठेवण्यात येत आहेत, असे सोनवणे यांनी सांगितले. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये राज्य सरकारने रेडीरेकनर दरात सरासरी पाच टक्के वाढ केली होती. यामध्ये ग्रामीण भागात ६.९६ टक्के तर नगरपालिका क्षेत्रात ३.६२ टक्के आणि महानगरपालिका क्षेत्रात ८.८० टक्क्यांनी ही वाढ करण्यात आली होती. हाच दर यावर्षीही पुढे कायम राहणार आहे. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकांसह गृहखरेदीदारांना दिलासा मिळणार आहे. मात्र, गुंतवणूक म्हणून मालमत्ता खरेदी करणाऱ्या नागरिकांना या निर्णयाचा फटका बसणार आहे.

## राजकीय विरोधकांच्या भेटी-गाठी

# खासदार बारणेंसाठी ‘फील गुड’!

### मताधिक्यासाठी मावळच्या महायुतीमधील नेत्यांकडून आश्वस्थ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निवडणुकीत विरोध करणाऱ्यांची खुल्या दिलाने भेट घेऊन राजकीय वातावरण ‘फील गुड’ करण्यात खासदार श्रीरंग बारणे यांनी भर दिला आहे. त्याचा त्यांना ऐन निवडणुकीत देखील फायदा होत असल्याचे दिसत आहे. भेट घेतल्यामुळे विरोधकही आपली राजकीय कटुता बाजूला ठेऊन खासदार बारणे यांच्या प्रचारात सूर मिसळत आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची घेतलेली ती भेट असो. अथवा सध्या आमदार सुनील शेळके, माजी आमदार बाळा भेगडे यांची भेट असो. ही भेट आपले राजकीय वातावरण सोपे करण्यासाठी असल्याचे चित्र आहे.**

महायुतीचे उमेदवार म्हणून खासदार बारणे यांची घोषणा होण्यापूर्वी बऱ्याच राजकीय नाट्यमय घडामोडी घडल्या. महायुतीमधीलच मित्रपक्षांनी खासदार बारणे यांची राजकीय गोची करायला सुरुवात केली होती. त्यामध्ये प्रामुख्याने मावळ विधानसभेतील आजी माजी आमदारांचा, पदाधिकाऱ्यांचा मोठा सहभाग होता. वरिष्ठ पातळीवरून या बंडावर पडदा टाकला आहे. मात्र त्यानंतर पॉलिटिकल विथ रिस्पेक्टची जबाबदारी स्वतः स्वीकारून बारणे कामाला लागल्याचे चित्र आहे. रविवारी (दि. ३१) त्यांनी मावळातील बंड करणाऱ्या नेत्यांच्या भेटी घेतल्या. आमदार सुनील शेळके यांच्या निवासस्थानी बारणे यांनी भेट दिली. त्यावेळी आमदारांचे वडील शंकरराव शेळके व परिवारातील सदस्य उपस्थित होते. शेळके परिवाराच्या वतीने खासदार बारणे यांचा सत्कार करून त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. त्यानंतर बारणे यांनी आमदार शेळके यांच्याशी तालुक्यातील राजकीय परिस्थितीबाबत सविस्तर चर्चा केली. तालुक्यात राष्ट्रवादी व भाजप या दोन्ही पक्षांची मोठी ताकद असल्याने बारणे यांना तालुक्यात विक्रमी मताधिक्य मिळेल, असा विश्वास शेळके यांनी यावेळी व्यक्त केला. भाजपचे नेते व माजी राज्यमंत्री संजय तथा बाळा भेगडे यांच्या निवासस्थानी भेट दिली. त्यावेळी बाळा भेगडे यांचे बंधू विकास भेगडे व परिवारातील सदस्य आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी तसेच 400 हून अधिक खासदार निवडून आणण्याचा भाजपचा संकल्प पूर्ण करण्यासाठी तालुक्यातील भाजपचे कार्यकर्ते जीवाचे रान करतील, अशी ग्वाही बाळा भेगडे यांनी दिली. भाजपचे मावळ विधानसभा मतदारसंघ प्रचारप्रमुख रवींद्र भेगडे यांच्या निवासस्थानी भेट दिली. या वेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या भेटीतून राजकीय आकस कमी करण्याचा प्रयत्न बारणे यांनी गत लोकसभा निवडणुकीप्रमाणे केला आहे. चिंचवड विधानसभेचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची भेट घेऊन अनेक वर्षांपासूनची राजकीय कटुता संपवली होती. त्यामुळे चिंचवड मधून बारणे यांना मताधिक्य मिळाले होते. यंदाही बारणे यांनी घेतलेली भेट त्यांना फायदेशीर ठरणार का हे पाहावे लागणार आहे.



#### भेटीनंतर मताधिक्याची ग्वाही...

» मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी मावळ विधानसभा मतदारसंघात आमदार सुनील शेळके, माजी राज्यमंत्री संजय तथा बाळा भेगडे, भाजपचे मावळ तालुका प्रचारप्रमुख रवींद्र भेगडे यांच्या निवासस्थानी जाऊन नेते तसेच कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी मावळच्या आजी-माजी आमदारांनी श्रीरंग बारणे यांना तालुक्यातून विक्रमी मताधिक्य मिळवून देण्याची ग्वाही दिली. तसेच यंदा खासदार बारणे हॅटट्रिक करतील. केंद्रात मंत्रिपद देखील मिळेल असा आशावाद पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. खासदार बारणे यांची ही भेट प्राथमिक टप्प्यात तरी सकारात्मक झाल्याचे दिसते.



#### बारामतीचे मिटले ; बारणेंचे फावले...

»बारामती लोकसभा मतदारसंघात माजी मंत्री विजय शिवतारे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात आक्रमक रान उठविले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठक घेऊनही तोडगा निघाला नाही. त्याला प्रत्युत्तर म्हणून मावळ मध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समर्थकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे समर्थक खासदार श्रीरंग बारणे यांची अडचण वाढवली होती. दरम्यानच्या काळात शिवतारे यांनी आपले बंड थंड केले. त्याचा परिणाम मावळ मध्ये देखील दिसला. अजित दादा समर्थकांनी आपला पाठिंबा बारणे यांना असल्याचे स्पष्ट केले आहे. बारामतीचा वाद मिटल्यामुळे खासदार बारणेंचे फावले असल्याची चर्चा आहे.

---

## पिंपळे निलखमध्ये वाघेरेंच्या गावभेट दौऱ्यास प्रतिसाद!

### » आमचं ठरलंय: शहरी भागात मतदारांचा वाढता पाठिंबा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या पिंपळे निलख गावभेट दौऱ्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. आमचं ठरलंय, असं म्हणत मावळ लोकसभेसाठी शहरी भागात मतदारांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. ठिकठिकाणी माता-भगिनींकडून संजोग वाघेरे पाटलांचे औक्षण करून स्वागत केले जात होते. “जय भवानी, जय शिवाजी” या घोषणांनी अक्षरशः परिसर दणाणून गेला होता. वाघेरे पाटील यांनी चालत चालत नागरिकांच्या गाठी-भेटी घेत होते. मतदारांकडून शुभेच्छांचा स्वीकार करीत संजोग वाघेरे पाटील मनापासून विचारपूस करत होते.**

: कडाक्याच्या उनाळा असूनही कार्यकर्त्यांच्या उत्साहात भरच पडत होती. वाघेरे पाटील यांना मावळ लोकसभेत पाठवण्याचा निर्धार येथील नागरिकांकडून केला जात आहे. पिंपळे निलख येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे, संतोष साठे, शिरीष साठे, पवन कामठे, नितीन इंगवले, प्रकाश बालवडकर, सचिन साठे, पृथ्वीराज साठे, भूषण इंगवले तसेच विशाल नगर येथील दिलीप बालवडकर, नंदू बालवडकर, आरती चौंधे, पवन कामठे, काळूराम नांडगुदे, पांडुरंग थोपटे, संकेत चौंधें, रवी साठे, अनिल संचेती, भुलेश्वर नांदगुडे, गणेश काटे, संदीप कामठे, महेश इंगवले, संकेत जगताप, मिरा कदम, संदीप कामठे, प्रदीप जगताप, शोभा नानी जगताप, माणिक भांडे, दौलत कामठे, संजय साठे, भाऊसाहेब बडगे, दिनेश टकले, सागर साठे, ज्ञानेश्वर मुरकुटे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ, जेष्ठ नागरिक, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



#### महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक

»दरम्यान, पिंपरी, चिंचवड विधानसभेतील महाविकास आघाडी व इंडिया आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक चिंचवडमध्ये पार पडली. या बैठकीत मावळ लोकसभेचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ सभा, मेळावे, राजकीय नेत्यांच्या सभा आणि प्रचार दौ-यांच्या नियोजनावर चर्चा झाली. नियोजन बैठकीत महाविकास आघाडी व इंडिया आघाडीतील घटक पक्ष, संघटना यांच्यासोबत चर्चा करण्यात आली. देशातील लोकशाहीच्या रक्षणासाठी एकजुटीने आपण सामोरे जात आहोत. मावळ लोकसभा मतदारसंघात पिंपरी व चिंचवड विधानसभख मतदारसंघाची भूमिका निर्णायक ठरणार आहे. प्रचाराचे योग्य नियोजन व सर्व पक्ष, संघटना यांच्यात समन्वय साधून संजोग वाघेरे पाटील यांना विजयी करण्याचा निश्चय उपस्थित पदाधिका-यांनी केला.




# संविधानावर अंतिम हल्ला..!

**खरे तर देशात काय घडू पाहात आहे याचा उघड उघड इशारा मिळाला होता. विरोधी पक्षांना काय होऊ घातले आहे हे समजत होते, पण विरोधातील नेत्यांच्या कोत्या सल्लागारांनी या नेत्यांना कोते सल्ले देऊन रोखले असावे. तमिळनाडू वगळता कुठल्याही रणांगणावर युद्धासाठी सज्ज असलेले सैन्य तातडीने पाठवण्यात आले नाही.**

पश्चिम बंगालमध्ये इंडिया आघाडी अजून व्हायची होती; बिहारमध्ये, नितीश कुमार यांनी त्यांचेच पेटंट असलेल्या कोलांटउडया मारत इंडिया आघाडीची बिघाडी करण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. महाराष्ट्रात, मित्रपक्ष जागावाटपावर वाद घालत आहेत, तर भाजप विरोधी पक्षातल्या नेत्यांची शिकार करण्यात व्यग्र आहे; उत्तर प्रदेशात, सपा आणि काँग्रेस एकत्र आले आहेत, पण अजून तरी ते लढाईत सामील झाल्याचे दिसत नाही; आणि दिल्ली आणि झारखंडमध्ये, सैन्य तयार आहे, पण सेनापती तुरुंगात आहेत. फक्त तमिळनाडूमध्ये इंडिया आघाडी आणि तिच्या विरोधी पक्षात सुरू असलेल्या संघर्षाने 'सुरुवात चांगली झाली तर अर्धी लढाई जिंकली झाली' या म्हणीची आठवण करून देण्यास सुरुवात केली आहे. हे २९ पैकी ७ राज्यांबाबत आहे. कर्नाटक, तेलंगणा, गुजरात, राजस्थान, हरियाणा, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या अन्य प्रमुख



रणांगणांमध्ये काँग्रेस आणि भाजप यांच्यात सरळ लढत आहे. याउलट, ओडिशा आणि आंध्र प्रदेश इथली लढत खरीखुरी न वाटता ठरवून केल्यासारखी वाटते. भाजपने आपले सगळे शस्त्रभांडार उघडले आहे. सगळयात वर आहे घटनाबाह्य निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून गोळा केलेल्या पैशांची थप्पी. निवडणूक रोख्यांचे वर्णन मी कायदेशीर लाचखोरी असे केले होते. त्यांच्याबाबतचे सत्य आता उघड झाले आहे. एखाद्याला अटक करण्यात आली, त्याने निवडणूक रोखे विकत घेतले आणि दान केले, ते रोखे वटवण्यात आले आणि संबंधित अटक प्रकरणे बंद करण्यात आली किंवा संबंधितांना हवे ते (परवाना, करार) देण्यात आले, अशी कितीतरी उदाहरणे आहेत. आपण तारखा तपासत गेलो की त्यामागची कहाणी समजत जाते. ठिपके जोडत गेलो की घटनाक्रम उलगडत जातो. वृत्तपत्रे, टीव्ही आणि होर्डिंग्जवरील जाहिरातींसाठी प्रचंड पैसा खर्च करण्यात आला आहे. या सगळयात भाजपच वरचढ आहे. त्यानंतर येते ऑपरेशन लोटस. पक्षांतरांना प्रोत्साहन द्या आणि पक्षांतर करणाऱ्यांना तिकीट द्या, हा खास भाजपचाच असा एक हातखंडा प्रयोग. भाजप अखेरीस ४०० हून अधिक उमेदवारांना उमेदवारी देईल, असे सांगितले जात आहे. ५० उमेदवार पक्षांतर करतील, असा अंदाज आहे. शस्त्रागारातील एक प्राणघातक शस्त्र म्हणजे 'ताब्यात घेणे आणि अटक करणे'. दोन मुख्यमंत्री, एक उपमुख्यमंत्री, अनेक राज्यमंत्री, मुख्यमंत्र्यांचे कुटुंबीय आणि इतर नेते आणि विरोधी राजकीय पक्षांचे नेते हे यासाठीचे लक्ष्य आहेत. सध्या संसदेच्या दोन्ही सभागृहांत भाजपचे ३८३ खासदार आहेत. भाजपकडे एकूण १,४८१ आमदार आणि १६३ विधान परिषद सदस्य आहेत. यामध्ये काही बिगरभाजप नेत्यांचाही समावेश आहे. ते भाजपच्या महाकाय वॉशिंग मशीनमध्ये धुतले जाऊन शुद्ध आणि निष्कलंक बनले आहेत. या २,०२७ जणांपैकी कोणाहीविरुद्ध सध्या तपास सुरू आहे की नाही हे मला माहीत नाही; तसे असेल तर, तो अतिशय दुर्मीळ अपवाद आणि गुपितच असू शकते. राज्य सरकारांच्या कामकाजात अडथळा आणण्यासाठी राज्यपालांचा वापर केला जात आहे. तमिळनाडूच्या राज्यपालांनी राज्य सरकारने तयार केलेले विधानसभेतील भाषण वाचण्यास नकार दिला; एकदा तर त्यांनी विधानसभेचे कामकाज सुरू असतानाच सभात्याग केला. मुख्यमंत्र्यांनी सांगितलेले असतानाही त्यांनी एकाला मंत्रीपदाची शपथ देण्यास नकार दिला. केरळ, तमिळनाडू आणि पश्चिम बंगालच्या राज्यपालांची मुख्यमंत्र्यांशी वारंवार बोलाचाली होते. तेलंगणाच्या राज्यपाल (आणि पुद्दुचेरीच्या नायब राज्यपाल) अनेक महिने तमिळनाडूतच होत्या आणि लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाले त्या दिवशी त्यांनी तातडीने आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि भाजप उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याचा आपला इरादा जाहीर केला! राज्यपालांनी विधेयके अनिश्चित काळासाठी रोखून धरली किंवा त्यांना संमतीच दिली नाही.

## संपादकीय »

### कार्बनचे रंग

***औद्योगिक उत्पादनामुळे वातावरणात जाणारा कार्बन करडा म्हणून ओळखला जातो.***

कार्बन म्हटल्यावर डोळ्यासमोर लगेच काळा रंग येतो. आज मात्र हवामान बदलाच्या दृष्टीने कार्बनचक्राचा नव्याने अभ्यास होत आहे. त्यामुळे स्रोत, स्थान आणि इतर वैशिष्ट्यांनुसार कार्बनचे वर्गीकरण करण्यासाठी रंग वापरायला सुरुवात झाली आहे.कार्बन उत्सर्जन कुठून होते, यावरून काळा, तपकिरी, करडा आणि लाल रंग ठरवलेले आहेत. काळा कार्बन म्हणजे पेट्रोलियमजन्य पदार्थांच्या अपूर्ण ज्वलनाने निर्माण होणारा डांबरासारखा पदार्थ. त्याचे कण वातावरणात पसरले कीं, सूर्यकिरणांमधील सुमारे २३ टक्के उष्णता शोषून घेतात. या वाढीव उबेमुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वर जाऊ लागते. ढग तयार होण्यावर परिणाम होतात आणि पावसाचे पॅटर्न बदलतात. पेट्रोलियम मिळायच्या आधीपासून माणूस झाडाच्या फांद्या, पालापाचोळा, मृत प्राणी जाळतो आहे. वाढत्या लोकसंख्येने हे बायोमास जाळण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यातून उत्सर्जित होणाऱ्या तपकिरी कार्बनमुळे पृथ्वीवरील पाण्याचे बाष्पीभवन घटते.

शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये नागरिकशास्त्राचा अभ्यास करताना लोकसभा, विधानसभा आणि महापालिका यांचे अधिकार आणि कर्तव्ये बहुतेक सर्व जण शिकलेले असतात. या प्रतिनिधी मंडळांमध्ये काम करणारे खासदार, आमदार आणि नगरसेवक यांच्याकडून कोणती कामे अपेक्षित असतात, हे सुद्धा आपल्याला माहिती असते.

# प्रकल्पांना गती देणारा खासदार हवा

दुर्दैवाने, निवडणुकीच्या रणधुमाळीत खासदाराकडून स्थानिक स्तरावरील नगरसेवकांकडून केली जाणारी कामे आणि नगरसेवकांकडून खासदाराच्या अखत्यारित येणाऱ्या कामांची जाहिरातबाजी राजकीय पक्षांकडून केली जाते. मतदार म्हणून आपण त्यावर विश्वास ठेवतो आणि खरे तर फसतोच. खासदाराच्या विकास निधीतून आपल्या परिसरातील एखाद्या व्यायामशाळेचे (ओपन जिम) उद्घाटन, एखाद्या वाचनालयाचे नूतनीकरण, रस्त्यावर सार्वजनिक स्वच्छतागृहांचे बांधकाम अथवा बसथांबे बांधून दिले, की 'खासदार खरेच कामाचा आहे,' अशी भावना होत असेल, तर नागरिकशास्त्राचे पुस्तक पुन्हा अभ्यासायला हवे.कायदेमंडळ म्हणून देशासाठी एखादे धोरण निश्चित करण्यात खासदाराचा सहभाग असतोच. तो सत्ताधारी पक्षाऐवजी विरोधी पक्षात असला, तरी उपयुक्त सूचना करणे खासदाराच्या हाती असतेच. त्याचवेळी केंद्र सरकारकडून



जाहीर केल्या जाणाऱ्या विविध योजनांमधून आपल्या मतदारसंघातील विकासकामांना गती देणे अथवा मतदारसंघातील केंद्रीय स्तरावरच्या प्रलंबित कामांसाठी संबंधित मंत्री किंवा मंत्रालयाच्या कामातून निधी मिळविणे, यासाठी दिल्लीत पाठपुरावा केला जाणे अपेक्षित आहे. एखाद्या योजनेसाठी राज्य सरकारची मदत लागते. अशावेळी संबंधित खासदाराने राज्य सरकारच्या माध्यमातून संबंधित योजना अथवा त्याद्वारे उपलब्ध होणारा निधी लवकर प्राप्त व्हावा, याची जबाबदारी घ्यायला हवी. देशभराच्या विविध भागांतील खासदार त्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. पहिल्यांदाच निवडून जाणाऱ्या एखाद्या खासदाराला कदाचित पहिल्या दोन-तीन वर्षांत विविध योजनांसाठी निधी मिळविण्यात अथवा मंत्री-मंत्रालयातील अधिकारी यांच्याशी थेट संपर्क नसल्याने पाठपुरावा करण्यात अडचणी निश्चित येऊ शकतात. मात्र, त्याचसाठी संसद अधिवेशनाच्या कालावधीशिवाय दिल्लीत तळ ठोकून राहणे, पक्षाच्या माध्यमातून अथवा काही वरिष्ठ सहकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन मतदारसंघातील योजनांच्या प्रगतीचा आढावा घेणे, काही .न. वि. गाडगीळ, इंदिरा मायदेव, ना. ग. गोरे, शंकरराव मोरे, एस. एम. जोशी, मोहन धारिया, विठ्ठलराव गाडगीळ या सर्वांनी स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या ३५-४० वर्षांमध्ये पुण्याचे प्रतिनिधीत्त्व संसदेत केले आहे. खासदार म्हणून ओळख होण्याआधीच यातील बहुतांश नावांचा देशभरात दबदबा होता. यातील काहींनी केंद्रीय मंत्रिमंडळासह इतर महत्त्वाच्या घटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यानंतरच्या काळात सुरेश कलमाडी हे नावही दिल्लीतील बहुतेकांच्या परिचयाचे होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भाजपाने आमच्यासमोर बंडखोर उभे केले

## निवडणुकीत आम्ही भाजपाला मदत गुलाबराव पाटील

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेचा शिंदे गट आणि भारतीय जनता पार्टीचं राज्यात सरकार असलं किंवा हे दोन्ही पक्ष महायुतीत एकत्र असले आणि हे पक्ष एकत्रितपणे आगामी निवडणुकांना सामोरे जाणार असले तर त्यांच्यातली धुसफूस अधूनमधून पाहायला मिळते. अनेक नेते एकमेकांवरील नाराजी उघडपणे बोलून दाखवत आहेत. माजी आमदार रामदास कदम आणि पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यामध्ये आघाडीवर आहेत.**




“मागच्या लोकसभा निवडणुकीत आम्ही भाजपाला मदत केली तरी विधानसभेला भाजपाने आमच्यासमोर बंडखोर उमेदवार उभे केले होते, असा आरोप गुलाबरावांनी केला आहे. तसेच ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी गुलाबरावांच्या आरोपांना उत्तरही दिलं आहे. गुलाबराव पाटील म्हणाले, मला असं वाटतं की, मागच्या वेळी ज्या गोष्टी घडल्या त्या यावेळी घडू नयेत. त्यामुळे आमच्या (महायुती) महाराष्ट्र स्तरावरील नेत्यांच्या बैठका झाल्या. या बैठकांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व पक्षांचे महत्त्वाचे नेते उपस्थित होते. त्यांना आम्ही सांगितलं की, मागच्या लोकसभा निवडणुकीत आम्ही भाजपासाठी काम केलं. मात्र भाजपाने विधानसभेत आमच्यासमोर बंडखोर उमेदवार उभे केले. त्याची पुनरावृत्ती होऊ नये असंही सांगितलं.गुलाबराव पाटील म्हणाले, लोकसभा निवडणुकीत आम्ही मन लावून काम करतोय. त्यामुळे सहाजिकच पुढील निवडणुकीत म्हणजेच विधानसभा निवडणुकीत आम्हाला त्यांनी मदत केली पाहिजे. अशी अपेक्षा ठेवणं काही गैर नाही. मागच्या वेळी ज्या गोष्टी घडल्या त्या पुढील काळात घडणार नाहीत असं आश्वासन वरिष्ठांनी आम्हाला दिलं आहे. गुलाबराव पाटलांच्या या वक्तव्यावर ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन आणि उत्तर महाराष्ट्रातील भाजपाचे वरिष्ठ नेते गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. महाजन म्हणाले, मागच्या वेळी भाजपाने कुठेही बंडखोर उमेदवार उभे केले नाहीत. बंडखोर उमेदवार कुठे उभे राहत असतील तर त्यांना आवरता येत नाही. तरीदेखील यावेळी कुठेही बंडखोरी होणार नाही याची काळजी घेतली जाईल.गिरीश महाजन यावेळी जागावाटपावरही बोलले. भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रातील त्यांचे लोकसभेचे २१ उमेदवार जाहीर केले आहेत. त्यापाठोपाठ शिंदे गटानेही ८ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. अजित पवार गटाने मात्र केवळ दोन उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामुळे महायुतीचे अद्याप १७ उमेदवार जाहीर होणं बाकी आहे. याबाबत गिरीश महाजन म्हणाले, महाराष्ट्रात एकनाथ शिंदे, अजित पवार, देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी जागावाटपावर चर्चा केली आहे. त्यावर दिल्लीतून शिक्कामोर्तब केलं जातं.एक-दोन जागांचा तिढा बाकी आहे. त्यावर चर्चा चालू असून दोन दिवसांत तो प्रश्नदेखील निकाली काढला जाईल. येत्या एक-दोन दिवसांत आपल्याला समजेल की, नाशिकच्या जागेवर कोणता उमेदवार असेल, सातारा-माढ्याच्या जागेवर कोणता उमेदवार असेल, परभणीतून कोणाला तिकीट मिळेल. लवकरच सर्व प्रश्न मार्गी लागतील.“मागच्या लोकसभा निवडणुकीत आम्ही भाजपाला मदत केली तरी विधानसभेला भाजपाने आमच्यासमोर बंडखोर उमेदवार उभे केले होते, असा आरोप गुलाबरावांनी केला आहे. तसेच ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी गुलाबरावांच्या आरोपांना उत्तरही दिलं आहे.

### भाजपाने बंडखोर उभे केले नाहीत

» गुलाबराव पाटील म्हणाले, मला असं वाटतं की, मागच्या वेळी ज्या गोष्टी घडल्या त्या यावेळी घडू नयेत. त्यामुळे आमच्या (महायुती) महाराष्ट्र स्तरावरील नेत्यांच्या बैठका झाल्या. या बैठकांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व पक्षांचे महत्त्वाचे नेते उपस्थित होते. त्यांना आम्ही सांगितलं की, मागच्या लोकसभा निवडणुकीत आम्ही भाजपासाठी काम केलं. मात्र भाजपाने विधानसभेत आमच्यासमोर बंडखोर उमेदवार उभे केले. त्याची पुनरावृत्ती होऊ नये असंही सांगितलं.गुलाबराव पाटील म्हणाले, लोकसभा निवडणुकीत आम्ही मन लावून काम करतोय. त्यामुळे सहाजिकच पुढील निवडणुकीत म्हणजेच विधानसभा निवडणुकीत आम्हाला त्यांनी मदत केली पाहिजे. अशी अपेक्षा ठेवणं काही गैर नाही. मागच्या वेळी ज्या गोष्टी घडल्या त्या पुढील काळात घडणार नाहीत असं आश्वासन वरिष्ठांनी आम्हाला दिलं आहे. गुलाबराव पाटलांच्या या वक्तव्यावर ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन आणि उत्तर महाराष्ट्रातील भाजपाचे वरिष्ठ नेते गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. महाजन म्हणाले, मागच्या वेळी भाजपाने कुठेही बंडखोर उमेदवार उभे केले नाहीत.

# निवडणुकीत प्रहार आणि मनोज जरांगे एकत्र येणार?

## मनोज जरांगे पाटील यांच्याशी काही चर्चा केलेली नाही : आमदार बच्चू कडू

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीत ‘मराठा’ मतपेढीची ताकद दाखवण्यासाठी प्रत्येक गावातून दोन उमेदवार देण्याचा निर्णय रद्द घेतल्यानंतर अपक्ष उमेदवार उभे करण्यास मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी नकार दिला. मराठा समन्वयक गावोगावी गेले नाहीत. जे गेले त्यांनी चुकीची माहिती आणली.**

त्यामुळे अपक्ष उमेदवार उभं करणं शक्य नाही. तसे केल्यास उमेदवार निवडून येणार नाहीत, असं सांगत जरांगे यांनी राजकीय आखाड्यातून माघार घेतली आहे. दुसऱ्या बाजूला मनोज जरांगे पाटील यांचा पाठिंबा मिळवण्यासाठी अनेक पक्ष आणि नेते प्रयत्न करत आहेत. आगामी निवडणुकीत मनोज जरांगे आपल्या बाजूने उभे राहिले तर मराठा समुदायाची मतं आपल्याला मिळतील असं अनेक उमेदवारांना आणि पक्षांना वाटतं. दरम्यान, आगामी निवडणुकीत अचलपूरचे आमदार बच्चू कडू यांचा प्रहार जनशक्ती पक्ष आणि मनोज जरांगे पाटील एकत्र येणार असल्याची चर्चा आहे. यावर बच्चू




कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आमदार बच्चू कडू यांनी शनिवारी संध्याकाळी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांना प्रश्न विचारण्यात आला की, तुम्ही आणि मनोज जरांगे पाटील आगामी निवडणुकीत एकत्र येणार आहात का? यावर बच्चू कडू म्हणाले, मी मुंबईच्या आमच्या दौऱ्यानंतर मनोज जरांगे पाटील यांच्याशी काही चर्चा केलेली नाही, मुंबईच्या दौऱ्यात असं काही बोलणं झालं नव्हतं. मी कुठल्याही राजकीय विचाराने त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला नव्हता. माझा त्या आंदोलनातील सहभाग केवळ सामाजिक होता. त्यांच्याशी राजकीय गोष्टी करणं मला योग्य वाटत नाही. प्रत्येकाने त्याचा त्याचा निर्णय घ्यावा. त्यांनी युती करावी यासाठी मी काही फोन वगैरे करणार नाही.आमदार बच्चू कडू म्हणाले, आम्ही लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर करण्यापूर्वी केवळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटलो. कारण त्यांचे आमच्यावर उपकार आहेत. त्यांनी आम्हाला दिव्यांग मंत्रालय दिलं आहे. मला मंत्रिपद न दिल्याबद्दल काही वाईट वाटत नाही. परंतु, अमरावतीची लोकसभा मात्र आम्ही लढवणारच. आता ब्रह्मदेव जरी खाली आला तरी आम्ही निवडणूक लढणारच. विचारांचा झेंडा समाधीनंतरही जिवंत राहतो तो आम्ही कायम ठेवणार.

### पढचा निर्णय महायुतीने घ्यायचा आहे

» आम्ही उमेदवार देणार आणि जिंकवणार. हीच आमची भूमिका आहे. या भूमिकेने आम्हाला खड्ड्यात घातलं तरी चालेल. परंतु, आम्ही मागे हटणार नाही.अचलपूरचे आमदार म्हणाले, अमरावती जिल्ह्याचं पोस्टमार्टेम झालेलं आहे. त्यात काही राहिलेलं नाही. आता केवळ निकाल बाकी आहे. या मतदारसंघात आमचाच उमेदवार निवडून येईल. मी आधीच सांगितलं आहे की आमची लढत ही मैत्रीपूर्ण आहे. अमरावती जिल्ह्याबाबतचा पुढचा निर्णय महायुतीने घ्यायचा आहे.

# इंडिया आघाडीची दिल्लीत महारॅली!

## केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवालही सहभागी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली मद्य धोरण गैरव्यवहारप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर ईडीकडून अटकेची कारवाई करण्यात आली. यानंतर न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना ईडी कोठडी सुनावली. केजरीवाल यांच्यावरील अटकेच्या कारवाईविरोधात इंडिया आघाडीने एकजूट दाखवत आज दिल्लीत 'लोकतंत्र बचाओ महारॅली'चे आयोजन केले आहे. इंडिया आघाडीच्या या रॅलीत जवळपास देशभरातील २८ पक्ष सहभागी होणार आहेत. या रॅलीत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यादेखील सहभागी होणार असून त्या रॅलीला त्या संबोधित करण्याची शक्यता आहे.**




अरविंद केजरीवाल यांना अटक झाल्यानंतर त्यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल या राजकारणात सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. केजरीवाल यांच्यावरील कारवाईनंतर सुनीता केजरीवाल यांनी अनेकदा पत्रकार परिषदा घेत संवाद साधला. अरविंद केजरीवाल तुरुंगात असल्यामुळे दिल्लीचे सरकार संकटात आहे. त्यामुळे दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदी सुनीता केजरीवाल या विराजमान होऊ शकतात, अशाही चर्चा आहेत. इंडिया आघाडीत एकजूट नाही, अशा प्रकारची टीका अनेकदा सत्ताधारी भाजपाकडून करण्यात येते. आता या टीकेला प्रत्युत्तर म्हणून आणि ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर इंडिया आघाडीतील विरोधी पक्षांनी पुन्हा एकदा दिल्लीत 'लोकतंत्र बचाओ महारॅली'चे आयोजन करत इंडिया आघाडीमध्ये एकजूट असल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या रॅलीमध्ये तृणमूल काँग्रेसचाही सहभाग असणार आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेविरोधात आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून ठिकठिकाणी निर्देशने करण्यात येत आहेत. यातच सुनीता केजरीवाल यांनी 'केजरीवालांना आशीर्वाद' या नावाने व्हॉट्सअॅप मोहीम सुरू केली आहे. आम आदमी पक्षासाठी सुनीता केजरीवाल या सध्या निर्णायक भूमिका घेताना दिसत असून त्या सध्या सक्रीय झाल्या आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य धोरण गैरव्यवहारप्रकरणात दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने १ एप्रिलपर्यंत कोठडी दिली आहे. मद्य धोरण प्रकरणात केजरीवाल यांना ईडीकडून तब्बल ९ वेळा समन्स बजावण्यात आले होते. मात्र, तरीही केजरीवाल ईडीसमोर चौकशीसाठी हजर झाले नव्हते. त्यानंतर त्यांच्यावर ईडीने अटकेची कारवाई केली होती. आज आम्ही निवडणूक प्रचाराला आलेलो नाही. आमच्या दोन बहिणी हिंमतीने लढत आहेत. कल्पना सोरेन आणि सुनीता केजरीवाल यांना साथ द्यायला आम्ही आलो आहोत. मी त्यांना सांगू इच्छितो सगळा देश तुमच्या बरोबर आहे, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी रामलीला मैदानावर भाषणाला सुरुवात केली. हेमंत सोरेन आणि अरविंद केजरीवाल यांना अटक करुन कुणी घाबरेल असं जर भाजपाला वाटत असेल तर मी सांगू इच्छितो देशातला प्रत्येक जण घाबरणारा नाही तर लढणारा आहे. हिंमत असेल तर सगळ्या एजन्सीजना घ्या आणि सांगून टाका, भाजपा सह ईडी, इन्कम टॅक्स आणि सीबीआय आहे. मी आव्हान देतो आहे. ४०० पारचा नारा भाजपाने दिला आहे. एक व्यक्ती आणि एका पक्षाचं सरकार देशासाठी घातक ठरणार आहे. आता ती वेळ आली आहे एका पक्षाचं सरकार चालणार नाही. मी देशाला आवाहन करतो की इंडिया आघाडीला निवडा.

### अब की बार भाजपा तडीपार

» समन्वय असलेलं आणि लोकांचा सन्मान करणारं सरकार आपल्याला आणायचं आहे. तसं करायचं नसेल तर तुमचं भवितव्य कुणाच्या हाती द्यायचं हा तुमचा प्रश्न आहे असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. आम्ही निवडणूक प्रचारासाठी नाही लोकशाही वाचली पाहिजे म्हणून आलो आहोत. अरविंद केजरीवाल, हेमंत सोरेन यांना तुरुंगात टाकलं. याचं कारण काय? ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप भाजपाने लावले होते त्यांना भाजपाने त्यांच्या वॉशिंगमध्ये धुतलं आणि आपल्या बरोबर मंचावर बसवलं.

असे भ्रष्ट लोक देशाचा विकास करु शकतात का? आपल्या रॅलीला भाजपाने ठगोंका मेला म्हटलं आहे. इथे जमलेले लोक ठग आहेत का? भाजपाचे लोक भ्रष्टाचारी आहेत. अब की बार ४०० पारचा नारा त्यांनी दिला आहे. मात्र या सरकारला दिल्लीत येऊ द्यायचं नाही. अब की बार भाजपा तडीपार हा नारा आपण दिला पाहिजे असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. उद्धव ठाकरेंनी रामलीला मैदानावर भाषणाला सुरुवात केली. हेमंत सोरेन आणि अरविंद केजरीवाल यांना अटक करुन कुणी घाबरेल असं जर भाजपाला वाटत असेल तर मी सांगू इच्छितो देशातला प्रत्येक जण घाबरणारा नाही तर लढणारा आहे.

# भाजप सरकारच्या काळात लोकशाही धोक्यात

## दिल्लीमध्ये 'युवा काँग्रेस'चे नेते आणि कार्यकर्त्यांनी निदर्शने

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**प्राप्तिकर विभागाने काँग्रेस पक्षाला १,८२३ कोटी रुपयांचा कर व दंड भरण्यासाठी नोटीस पाठविल्याने शनिवारी देशभरात पक्षाच्या कार्यकत्या र्यांनी निदर्शने केली. भाजपवर 'कर दहशवादी' असा आरोप करून भाजप सरकारच्या काळात लोकशाही धोक्यात असल्याचा आरोप केला.**



दिल्लीमध्ये 'युवा काँग्रेस'चे नेते आणि कार्यकर्त्यांनी निदर्शने करण्यात आली. केंद्र सरकार काँग्रेसला निरनिराळया मार्गानी कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र आमचा पक्ष त्याला घाबरत नसल्याचे 'युवा काँग्रेस'चे अध्यक्ष श्रीनिवास बी व्ही यांनी स्पष्ट केले. कर नियमांच्या खाली काँग्रेसला त्रास दिला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. देशभरातील अनेक शहरांतील काँग्रेस कार्यालयांबाहेर काँग्रेस कार्यकर्त्यांनी भाजप सरकारचा जोरदार निषेध करत 'लोकशाही वाचवा' अशी घोषणा दिली. "लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्ष वरचढ ठरू नये यासाठी भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या सांगण्यावरून काँग्रेसला नोटिसा पाठवल्या जात आहेत. मुक्त व निष्पक्ष निवडणुका होऊ नयेत म्हणून प्राप्तिकर विभाग जाणूनबुजून हे करत आहेत," असा आरोप छत्तीसगडचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष एच. एस. लकी यांनी केला. काँग्रेसचे सरचिटणीस पृथ्वीराज साठे हे गुवाहाटी येथे काँग्रेसच्या आंदोलनात सहभागी झाले. आम्हाला रस्त्यावर आंदोलनाची परवानगी न मिळाल्यामुळे त्यामुळे आम्हाला पक्ष कार्यालयात निदर्शने करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले. विरोधकांना रस्त्यावर आंदोलन करू न देऊन भाजप लोकशाहीचा गळा घोटत असल्याचा आरोप साठे यांनी केला. नवी दिल्लीत काँग्रेसकडून आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेच्या व्यासपीठावर धुलाई यंत्र दाखवत काँग्रेसने शनिवारी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. हे भाजपचे धुलाई यंत्र असून सत्ताधारी पक्षाशी जुळवून घेणाऱ्या नेत्यांना यामध्ये स्वच्छ करून घेतले जाते, असा टोला काँग्रेसने लगावला.

### विरोधी पक्ष वरचढ ठरू नये

» "लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्ष वरचढ ठरू नये यासाठी भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या सांगण्यावरून काँग्रेसला नोटिसा पाठवल्या जात आहेत. मुक्त व निष्पक्ष निवडणुका होऊ नयेत म्हणून प्राप्तिकर विभाग जाणूनबुजून हे करत आहेत," असा आरोप छत्तीसगडचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष एच. एस. लकी यांनी केला. काँग्रेसचे सरचिटणीस पृथ्वीराज साठे हे गुवाहाटी येथे काँग्रेसच्या आंदोलनात सहभागी झाले. आम्हाला रस्त्यावर आंदोलनाची परवानगी न मिळाल्यामुळे त्यामुळे आम्हाला पक्ष कार्यालयात निदर्शने करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

# विक्रांत मेस्सीने लाडक्या लेकासाठी काढला खास टॅटू

बॉलीवूड अभिनेता विक्रांत मेस्सीला ‘12TH FAIL’ चित्रपटामुळे ओळख मिळाली. आयपीएस पोलीस अधिकारी मनोज शर्मा यांच्या संघर्षावर आधारित असलेल्या या चित्रपटातील अभिनयाद्वारे विक्रांतने प्रेक्षकांची वाहवा मिळवली. विक्रांतचा नवा चित्रपट ‘द साबरमती रिपोर्ट’ लवकरच चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. अशातच विक्रांत सध्या त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. ७ फेब्रुवारी रोजी विक्रांत व त्याच्या पत्नीला पुत्ररत्नाचा लाभ झाला आणि वरदान त्यांच्या आयुष्यात आला. विक्रांत मेस्सीनं मुलाच्या जन्माच्या १६ दिवसांनंतर त्याची पहिली झलक दाखवली. आपल्या लाडक्या लेकाचं नाव वरदान ठेवत विक्रांतनं त्याच्या सोशल मीडियावरील अकाउंटवरून खास पोस्ट शेअर केली होती. “वरदान आमच्यासाठी आशीर्वादापेक्षा काही कमी नाही. आम्ही आमच्या मुलाचं नाव वरदान ठेवलं आहे,” अशी कॅप्शन विक्रांतने या पोस्टला दिली आहे.आपल्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग झालेला लेक वरदान याची आठवण म्हणून आता विक्रांतने आपल्या लाडक्या लेकासाठी खास टॅटू काढला. विक्रांतने स्वत:च्या हातावर त्याच्या नावाचा आणि वाढदिवसाच्या तारखेचा खास टॅटू काढला आहे. या टॅटूचा फोटो विक्रांतने







आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला आहे. “आयुष्यातली ही भर असो किंवा हे व्यसन असो. मला तशाही या दोन्ही गोष्टी खूप आवडतात,” असं कॅप्शन देत विक्रांतने ही स्टोरी आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केली आहे.दरम्यान, विक्रांतच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, विक्रांत ’12TH FAIL’ चित्रपटामुळे घराघरांत पोहोचला. ‘द साबरमती रिपोर्ट’ चित्रपटाद्वारे विक्रांत पुन्हा एकदा नव्या भूमिकेत प्रेक्षकांचं मनोरंजन करताना दिसणार आहे. ३ मे २०२४ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. त्याशिवाय ‘सेक्टर ३६’, ‘फिर आई हसीन दिलरुबा’ या चित्रपटांमध्ये विक्रांत पाहायला मिळणार आहे.बॉलीवूड अभिनेता विक्रांत मेस्सीला ‘12TH FAIL’ चित्रपटामुळे ओळख मिळाली. आयपीएस पोलीस अधिकारी मनोज शर्मा यांच्या संघर्षावर आधारित असलेल्या या चित्रपटातील अभिनयाद्वारे विक्रांतने प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

## हॉरर आणि कॉमेडीचा तडका!

अरनमानाई 4 या चित्रपटाच्या निर्मात्यांनी या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज केला आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना नक्कीच खास अनुभव देणार आहे यात शंका नाही. हॉरर-कॉमेडी असलेला हा नवीन चित्रपट तमन्ना भाटियाची वेगळी बाजू दाखवून देणार आहे. तमन्ना या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार असून या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये तिचा हटके अंदाज बघायला मिळत आहे. अरनमानाई 4 या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांना खिळवून ठेवतो. अरनमानाई 4 चित्रपटाचे दिग्दर्शन सुंदर सी. आणि खुशबू सुंदर यांनी अवनी सिनेमॅक्सच्या बॅनरखाली केले आहे. या चित्रपटात सुंदर, राशी खन्ना, संतोष प्रताप आणि आणखी काही प्रमुख भूमिका आहेत.’अरनमानाई 4’ या चित्रपटाच्या व्यतिरिक्त तमन्नाचे आणखी काही चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत.


## सैफची लेक भडकली

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री सारा अली खान तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असते. साराला अनेक वेळा पापाराझी स्पॉट करते. सारा अनेक वेळा स्ट्रीट शॉपिंग करताना किंवा विविध कार्यक्रमांना हजेरी लावताना स्पॉट होते, अशातच साराचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे ज्यामध्ये ती पुण्याचे काम करताना दिसत आहे. व्हिडीओमध्ये सारा ही मंदिराच्या बाहेर बसलेल्या गरजूंना अन्न देताना दिसत आहे. साराच्या या व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले आहे.सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये सारा ही गरजू मुलांना फूड पॅकेट वाटताना दिसत आहे. यावेळी, जेव्हा पापाराझी तिला कॅमेऱ्यात कैद करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा सारा भडकते.पापाराझी फोटो काढत असल्याचं जेव्हा सारा अली खानच्या लक्षात येतं तेव्हा ती चिडते आणि म्हणते, “थांबा! कृपया शूट करू नका. मी तुम्हाला हे अनेकवेळा सांगितलं आहे”सारा अली खानचे नुकतेच ‘मर्डर मुबारक’ आणि ‘ए वतन मेरे वतन’ हे दोन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले. या दोन्ही चित्रपटातील साराच्या कामाचे अनेकांनी कौतुक केलं आहे. सारासोबतच सचिन खेडेकर, अभय वर्मा, स्पर्श श्रीवास्तव, एलेक्स नील आणि आनंद तिवारी या कलाकारांनी ‘ऐ वतन मेरे वतन’ या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली .



## ट्रोल करणाऱ्यांना सई लोकूरचं सडेतोड उत्तर

प्रसिद्ध अभिनेत्री सई लोकूर (SAI LOKUR) ही तिच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे चर्चेत असते. सईनं काही महिन्यांपूर्वी मुलीला जन्म दिला. सईनं सोशल मीडियावर पोस्टकरुन ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली. सई तिच्या कुटुंबासोबतचे तसेच तिच्या वेगवेगळ्या लूकमधील फोटो सोशल मीडियावर शेअर करत असते. सईनं शेअर केलेल्या फोटोवर कमेंट करुन अनेकजण तिला वजनावरुन ट्रोल करतात. अशातच आता सईनं आता वजनावरुन ट्रोल करणाऱ्यांना सडेतोड उत्तर दिलं आहे.सईनं इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करुन ट्रोलर्सला सडेतोड उत्तर दिलं आहे. तिनं पोस्टमध्ये लिहिलं, “लोकांना जाड आणि बारीक यापलिकडे काही दिसतच नाही का?”सईनं आणखी एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिनं लिहिलं, “महिलांना साधारणपणे सहा महिन्यांची प्रसूती रजा मिळते,स्वतःची आणि त्यांच्या बाळाची काळजी घेण्यासाठी. मी 3 महिन्यांनी काम सुरू केले. ब्रँड कोलॅब्रेशन्स करणे,कंटेन्ट शूट करणे, इनफ्लुएन्सर म्हणून प्रोडक्ट्स प्रमोट करणं, इत्यादी कामं मी करत होते. माझ्या प्रयत्नांचे कौतुक करण्याऐवजी, लोकांना फक्त माझी फॅट बॉडी दिसते. देवा! ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. आपण कोणत्या समाजात राहत आहोत? एकमेकांना सपोर्ट करण्याऐवजी लोक एकमेकांचे पाय खेचत आहेत.”सई लोकूरला मराठी बिग बॉस या शोमुळे विशेष लोकप्रियता मिळाली. कीस किसको प्यार करू,प्लॅटफॉर्म, जरब या चित्रपटांमध्ये काम केलं. सई सोशल मीडियावर ॲक्टिव असते. तिला इन्स्टाग्रामवर 322K फॉलोवर्स आहेत. सईनं 2020 मध्ये तीर्थदीप रॉयसोबत लग्नगाठ बांधली. सई आणि तीर्थदीप यांनी त्यांच्या मुलीचं नाव ताशी असं ठेवलं आहे.



## खचून न जाता मी सतत काम करतो : अक्षय

हिंदी चित्रपटसृष्टीत एकापाठोपाठ एक अपयशी चित्रपटांची मालिका दिल्यानंतरही नव्या चित्रपटाबरोबर नव्या उत्साहाने कामाला लागणारा, त्याच तडफेने आपली भूमिका करणारा अभिनेता म्हणून अक्षय कुमारचे नाव घेतले जाते. नवे चित्रपट, नवे प्रयोग करण्याच्या बाबतीत आघाडीवर असलेला अक्षय सध्या ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ या चित्रपटाच्या निमित्ताने माध्यमांसमोर आला आहे. अपयशाने खचून न जाता मी सतत काम करत राहतो, असे अक्षयने या चित्रपटाच्या अनुषंगाने बोलताना सांगितले. देशाच्या सुरक्षेचा वसा घेतलेले सैनिक प्रसंगी देशासाठी प्राणाची आहुती द्यायलाही तयार असतात. सीमेवर राहून पहारा देत देशाचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांप्रमाणेच काही सैनिक असेही आहेत जे वेगवेगळ्या देशात जाऊन आपल्या देशाच्या सुरक्षेसाठी धोका निर्माण करणाऱ्या शत्रूंना धडा शिकवतात. अशाच दोन सैनिकांची गोष्ट ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ या चित्रपटात प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे, असे अक्षयने सांगितले. देशाचे शत्रू हे कोणत्याही एका जातीचे, समाजाचे वा प्रांतापुरते मर्यादित नसतात. ते शत्रू असतात आणि त्यांच्यापर्यंत पोहोचून त्यांना शिक्षा दिली गेली पाहिजे, या संकल्पनेवर हा चित्रपट आधारित आहे. या चित्रपटात अभिनेता अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ धमाकेदार ॲक्शन भूमिकेत पाहायला मिळणार आहे. अली अब्बास जफर दिग्दर्शित ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ हा चित्रपट १० एप्रिल रोजी हिंदी, तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि कन्नड भाषेत प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफसोबत अभिनेत्री मानुषी छिल्लर, अलाया एफ आणि पृथ्वीराज यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.

# लखनऊने मिळवला पहिला विजय!

## पदार्पणवीर मयंक यादव ठरला विजयाचा नायक

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**लखनऊ सुपर जायंट्स संघाने आयपीएल २०२४ मधील आपला पहिला विजय मिळवला आहे. लखनऊचा संघ आपल्या घरच्या मैदानावर विजय नोंदवण्यात यशस्वी ठरला आणि त्यांनी पंजाब किंग्सवर २१ धावांनी विजय मिळवला. लखनऊ संघाचा पदार्पणवीर मयंक यादवच्या भेदक आणि वेगवान गोलंदाजीच्या जोरावर संघाने पंजाब किंग्सकडून विजय हिसकावून घेतला. मयंक यादव आणि नंतर मोहसीन खान हे संघाच्या विजयाचे नायक ठरले.**




लखनऊच्या अटलबिहारी वाजपेयी एकना स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात लखनऊने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत १९९ धावा केल्या. प्रत्युत्तरात पंजाब किंग्जला चांगल्या सुरुवातीनंतर २० षटकांत ५ गडी गमावून केवळ १७८ धावाच करता आल्या. लखनऊकडून वेगवान गोलंदाज मयंक यादवमुळे लखनऊने सामन्यात शानदार पुनरागमन केले. केएल राहुलऐवजी निकोलस पुरन या सामन्यात संघाचे नेतृत्व करत होता. सुरूवातीला शिखर आणि बेयरस्टोची फलंदाजी पाहता सामना हातातून निसटल्याचे दिसले पण मयंकच्या गोलंदाजीने सामन्याचा रोख बदलला.२०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाब किंग्जची सुरुवात चांगली झाली. सलामीवीर शिखर धवन आणि जॉनी बेअरस्टो यांनी पहिल्या विकेटसाठी १०२ धावांची मोठी भागीदारी केली. शिखर धवनने ५० चेंडूत ३ षटकार आणि ७ चौकारांच्या जोरावर ७० धावा केल्या. तर बेयरस्टो ३ चौकार आणि ३ षटकार लगावत २९ चेंडूत ४२ धावा करत बाद झाला. प्रभसिमरन सिंगने येताच विस्फोटक फलंदाजीला सुरुवात केली. बाद होण्यापूर्वी त्याने ७ चेंडूत १९ धावा केल्या,ज्यात त्याने २ षटकार आणि एक चौकार लगावला. तर जितेश शर्मा ९ चेंडूत ६ धावा करत बाद झाला. लिव्हिंगस्टोनने संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला पण तोपर्यंत सामना हातातून निसटला होता. लियामने १७ चेंडूत २ षटकार आणि २ चौकारासह २८ धावांची नाबाद खेळी केली. शिखर धवन आणि बेयरस्टोची भागीदारी तोडणं कोणालाच शक्य होत नव्हतं. पण पदार्पणाचा सामना खेळत असलेल्या मयंक यादवने ही भागीदारी तोडली. मयंकने १२व्या षटकातील चौथ्या चेंडूवर जॉनी बेअरस्टोला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. मयंक यादवने १४व्या षटकात आणखी एक विकेट मिळवली. त्याने प्रभसिमरन सिंगला नवीन उल हककरवी झेलबाद केले. त्यानंतर पंजाबची धावसंख्या १३९ धावांवर असताना त्यांनी तिसरी विकेट गमावली. मयंक यादवच्या चेंडूवर उपकर्णधार जितेश शर्मा झेलबाद झाला. मयंक यादवने आपला पदार्पण सामना खेळताना शानदार गोलंदाजी करत एलएसजीला सामन्यात परत आणले. मयंकने त्याच्या ३ विकेटसह यंदाच्या आयपीएलमधील १५५.८ किमी प्रति तास वेग असलेला सर्वात वेगवान चेंडू टाकला. सतत भेदक आणि वेगवान गोलंदाजीचा मारा करत त्याने फलंदाजांनी जेरीस आणले.पंजाब किंग्जला १७व्या षटकात दोन मोठे धक्के बसले. मोहसीन खानने षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर कर्णधार शिखर धवनची विकेट घेतली. त्यानंतर त्याच षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर मोहसीन खानने सॅम करनला निकोलस पुरनकरवी झेलबाद केले. करन गोल्डन डकवर बाद झाला आणि तिथून पंजाबच्या विजयाच्या आशा संपुष्टात आल्या. तत्पूर्वी, लखनऊने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी गमावून १९९ धावा केल्या. सलामीवीर क्विंटन डी कॉकने अर्धशतक (५४) झळकावले. त्याच्याशिवाय कृणाल पांड्याने ४३ धावांची तर निकोलस पुरनने ४२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली, ज्यामुळे संघाला २०० धावांचा टप्पा गाठता आला. पंजाब किंग्जकडून सॅम करनने ३ विकेट्स मिळवले.

### लखनऊची प्रथम फलंदाजी

» लखनऊच्या अटलबिहारी वाजपेयी एकना स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात लखनऊने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत १९९ धावा केल्या. प्रत्युत्तरात पंजाब किंग्जला चांगल्या सुरुवातीनंतर २० षटकांत ५ गडी गमावून केवळ १७८ धावाच करता आल्या. लखनऊकडून वेगवान गोलंदाज मयंक यादवमुळे लखनऊने सामन्यात शानदार पुनरागमन केले. केएल राहुलऐवजी निकोलस पुरन या सामन्यात संघाचे नेतृत्व करत होता. सुरूवातीला शिखर आणि बेयरस्टोची फलंदाजी पाहता सामना हातातून निसटल्याचे दिसले पण मयंकच्या गोलंदाजीने सामन्याचा रोख बदलला.सलामीवीर शिखर धवन आणि जॉनी बेअरस्टो यांनी पहिल्या विकेटसाठी १०२ धावांची मोठी भागीदारी केली.

# हार्दिकला ट्रोल करत असलेल्यांना अश्विनने सुनावले

## तुम्ही इतर देशांमध्ये खेळाडूंच्या चाहत्यांना असं भांडताना पाहिलंय का?

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचा दिग्गज क्रिकेटपटू आणि राजस्थान रॉयल्सचा खेळाडू रविचंद्रन अश्विनने मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याला पाठिंबा दिला आहे. आयपीएलच्या या हंगामात हार्दिकला ट्रोलिंगचा सामना करावा लागत आहे. मुंबई इंडियन्सचा नियमित कर्णधार रोहित शर्माच्या जागी त्याला संघाचे नेतृत्त्व सोपवल्यापासून हार्दिकवर सर्वांनीत निशाणा साधला आहे. स्टेडियममध्ये त्याच्या विरोधात जोरदार टीका होत आहे.**




अश्विनने त्याच्या यूट्यूब चॅनलवर लाईव्ह स्ट्रीम दरम्यान, हे सुरू असलेले फॅन्स वॉर संपवण्याची मागणी केली, कारण ही होणारी टीका फार वाईट वळण घेत आहे. हार्दिकला ट्रोल केले जात असल्याप्रकरणी अश्विन म्हणाला, "यामध्ये कोणाचीही भूमिका नाही. यात फ्रँचायझी किंवा खेळाडूची कोणतीही भूमिका नाही. माझ्या मते जबाबदारी आणि दबाव हा चाहत्यांवर आहे." २०२४ च्या हंगामात मुंबई इंडियन्सची सुरुवात खराब झाली आहे. संघाने प्रयत्न करूनही दोन्ही सामने संघाने गमावले आहेत. अहमदाबादच्या जमावाने हार्दिकला चांगलेच ट्रोल केले होते. हार्दिकने गुजरात टायटन्सचा संघ सोडून मुंबई संघात परतला आहे.अश्विन म्हणाला पुढे म्हणाला, "तुम्ही इतर कोणत्याही देशात असे घडताना पाहिले आहे का? तुम्ही जो रूट आणि जॅक क्रॉऊलीच्या चाहत्यांना भांडताना पाहिले आहे का? किंवा जो रूट आणि जोस बटलरच्या चाहत्यांमध्ये झालेली अशी भांडणं तुम्ही पाहिली आहेत का? ही फार विचित्र गोष्ट आहे. स्टीव्ह स्मिथ आणि पॅट कमिन्सचे चाहते ऑस्ट्रेलियात भांडतात का? मी हे अनेकदा सांगितले आहे. हे क्रिकेट आहे. एखादा सिनेमा नाही. मला माहित आहे की

### गांगुली सचिनच्या नेतृत्वाखाली खेळला

» मी ते नाकारत नाही. मी या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवत नाही परंतु हे सर्व चुकीचेही नाही," अश्विन म्हणाला."चाहत्यांनी एखाद्या खेळाडूला इतक्या टोकाला जाऊन ट्रोल करू नये. हे खेळाडू कोणत्या देशाचे प्रतिनिधित्व करतात ते लक्षात ठेवा-आपल्या देशाचे. मग कोणत्याही क्रिकेटपटूला असं ट्रोल करणं योग्य आहे का? हे माझ्या समजण्यापलीकडचे आहे. "गांगुली सचिनच्या नेतृत्वाखाली खेळला आहे आणि नंतर सचिन गांगुलीच्या नेतृत्वाखाली खेळला. हे दोघेही राहुल द्रविडच्या नेतृत्वाखाली खेळले आहेत. तर तिघेही अनिल कुंबळे आणि धोनीच्या नेतृत्वाखाली खेळले. धोनीही विराट कर्णधार असताना संघात खेळला आहे," ही उदाहरणे देत अश्विनने चाहत्यांना समजावून सांगितले.